“नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक
बहुसदस्यीय प्रभाग रचना (सदस्य संख्या,
प्रभाग रचना व आरक्षण) आदेश, २०२१”

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का-६
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २७ डिसेंबर, २०२१

## आ दे श

**ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदींनुसार:-

i) नगरपरिषदांच्या निवडणुकांचे अधिक्षण (superintendence), संचालन (direction) व नियंत्रणाचे (control) पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित (vested) केले आहेत.

ii) नगरपरिषदेच्या निवडणुका मुक्त (free), न्याय्य (fair) व पारदर्शक (transparant) वातावरणात पार पाडण्याची पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

iii) नगरपरिषदेची मुदत संपण्यापूर्वी तेथे सार्वत्रिक निवडणूक घेणे अपेक्षित आहे.

**आणि ज्याअर्थी,** नगरपरिषद निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे आणि प्रत्यक्ष निवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या तिन्ही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत. नगरपरिषदांच्या

निवडणुकीसंदर्भातील विविध टप्पे व उप-टप्पे पूर्ण करण्याकरिता लागणारा कालावधी विचारात घेता, प्रभाग रचनेची सुरुवात सर्वसाधारणपणे मुदत संपण्याच्या सुमारे सहा महिने अगोदर केली जाते.

**आणि ज्याअर्थी,** शासनाने दरम्यानच्या कालावधीत खालील अध्यादेश निर्गमित केले आहेत:-

i. महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक-५/२०२१, दि. ०१/१०/२०२१ याअन्वये नगरपरिषदांच्या निवडणुकांकरिता प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य, परंतु तीन पेक्षा अधिक नाहीत इतके सदस्य निवडून देण्याची तरतूद केली आहे.

ii. महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक-६/२०२१, दि. १/१०/२०२१ याअन्वये नगरपरिषदेमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या एकूण जागांच्या संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असेल, मात्र एकूण आरक्षण नगरपरिषदेच्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, अशा आशयाची तरतूद केली.

मात्र सदर सुधारणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामधील रिट याचिका क्र. ८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/ २०२१ व रिट याचिका क्र. १३१६ / २०२१ मध्ये दि. १५/१२/२०२१ रोजी झालेल्या निर्णयास अनुसरुन जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करून त्याबाबत तरतूद करत नाही तोपर्यंत आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे.

iii. महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक- १०/२०२१, दि. २/११/२०२१ याअन्वये नगरपरिषदांमध्ये निवडून द्यावयाच्या किमान व कमाल सदस्यांची संख्या सुधारीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये झालेल्या उपरोक्त सुधारणा व न्यायालयीन निर्णय यांना अनुसरुन नगरपरिषदांच्या निवडणुकांकरिता प्रभाग रचना करण्याबाबत सुधारित आदेश देणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी,** मी, यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० व १० अ(४) नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून त्याअंतर्गत नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्य संख्या ठरविणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. **<u>संक्षिप्त नाव:</u>**

या आदेशाला "**नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूक बहुसदस्यीय प्रभाग रचना (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) आदेश, २०२१**" असे संबोधिले जाईल.

२. **<u>अधिकार प्रदान:</u>**

राज्य निवडणूक आयोगाने, नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेतील प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करण्याच्या अनुषंगाने सदस्य संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण निश्चित करून ते चक्रानुक्रमे फिरवणे, या बाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का-६, दि.०६/०२/२०२० अन्वये संबंधितांना यापूर्वीच प्रदान केले आहेत. लोकशाही मजबूत करण्यात नगरपरिषदांची भूमिका महत्वपूर्ण आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या निवडणुकांचे कामकाज पार पाडतांना लोकसभा व विधानसभा

निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे आवश्यक आहे. प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय्य व पारदर्शक रितीने पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

३. <u>**विहित मुदतीत निवडणूक घेणे:**</u>

भारतीय संविधानाने विहित केलेल्या मुदतीतच निवडणूक घेणे शक्य व्हावे म्हणून, राज्य शासनाने नगरपरिषदांची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये बदल (विभाजन, एकत्रीकरण इत्यादी) करू नये. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि. २७ जानेवारी, २००५ चे आदेश आहेत.

४. **प्रभाग रचना करण्याची कार्यपद्धती:**

४.१ **जनगणनेची लोकसंख्या**

जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेली लगतच्या जनगणनेनुसार नगरपरिषद क्षेत्राची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या, प्रगणक गटाचे नकाशे व घरयादी जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी. प्रभाग रचना ही फक्त **लगतच्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या** आधारे केली जाते, म्हणून त्या क्षेत्रातील मतदार संख्या अथवा सध्याची रहिवाशांची संख्या याचा प्रभाग रचनेशी कसलाही संबंध येत नाही.

४.२ **सदस्य संख्या:**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ व १० मधील तरतुदीनुसार नगरपरिषदांची एकूण सदस्य संख्या निश्चित करतांना क्षेत्रातील जनगणनेतील लोकसंख्येच्या आधारावर <u>**परिशिष्ट १**</u> नुसार नगरपरिषदेच्या एकूण सदस्य संख्येची परिगणना करण्यात यावी. यानुसार परिगणना करताना महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०/२०२१ अन्वये सदस्य संख्येबाबत करण्यात आलेली सुधारणा विचारात घ्यावी.

वर उल्लेख केल्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १५/१२/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये सद्यस्थितीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता कोणत्याही जागा देय होणार नाहीत.

**४.३ प्रभागाची संख्या:**

महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५/२०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० मध्ये केलेल्या सुधारणेनुसार शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य, परंतु तीनपेक्षा अधिक नाहीत इतके सदस्य निवडून देण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार नगरपरिषदेस प्रभाग अनुज्ञेय होतात. प्रभागांची संख्या **परिशिष्ट १** नुसार काढावी.

प्रभागांची संख्या ठरविताना शक्यतोवर सर्व प्रभाग दोन सदस्यांचे करावयाचे आहेत. सर्वच प्रभाग दोन सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन सदस्यांचा होईल. तीन सदस्यांचा प्रभाग हा भौगोलिक परिस्थिती विचारात घेवून योग्य त्या ठिकाणी ठेवता येईल. मात्र जर अशी कोणतीही परिस्थिती नसल्यास सदर प्रभाग हा शेवटचा राहील.

नगरपरिषद क्षेत्राचे प्रभाग पाडल्यानंतर प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्य संख्येनुसार प्रभागातील जागांना प्रभागाच्या अनुक्रमांकासह यथास्थिती “अ”, “ब” व “क” असे संबोधण्यात यावे. त्यानुसार उदा. प्रभाग क्र. १५ मध्ये तीन जागा असल्यास त्यांना “१५-अ”, “१५-ब” व “१५-क” असे संबोधण्यात येईल.

४.४ **प्रभागांची सरासरी लोकसंख्या**:- प्रभाग रचना करताना नगरपरिषदेची एकूण लोकसंख्या भागिले नगरपरिषदेची एकूण सदस्य संख्या गुणिले संबंधित प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या या सूत्रानुसार प्रभागाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी. प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त या मर्यादेत ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल

मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक राहील.

**४.५ प्रभाग रचना करण्याची मार्गदर्शक तत्वे:**

४.५.१ प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी.

४.५.२ प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, फ्लायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळ्या जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच पाहिजेत. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे.

४.५.३ प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची भौगोलिकदृष्टया आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्या तरी नागरिकांच्या सामायिक हिताकरिता खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(अ) प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ब) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(क) नागरिकांचे प्रभागामधील दळणवळण शक्यतो विचारात घ्यावे.

(ड) प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रे, दवाखाने, स्मशानभूमी, बाजारहाटाच्या जागा, पाणी पुरवठ्याच्या तसेच जलनि:सारणाच्या सोयी सुविधा, इ.चा वापर ज्या नागरिकांकडून करण्यात येतो त्या नागरिकांचा समावेश असलेल्या प्रभागातच शक्यतोवर त्या सोयी सुविधा ठेवण्यात याव्यात.

(इ) प्रभागातील मुलांकरिता सर्वसाधारणपणे उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक शाळा, मैदाने, इ. शक्यतोवर त्याच प्रभागात ठेवण्यात याव्यात, इत्यादी.

४.५.४ प्रभाग रचना करताना प्रगणक गट शक्यतो फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक असेल व घरयादी उपलब्ध नसेल, तर त्या प्रकरणी सोबतच्या परिशिष्ट-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लोकसंख्या कशाप्रकारे वितरित झाली आहे, हे निश्चित करावे. सर्वेक्षण करताना जनगणना ज्यावेळी झाली त्यावेळी म्हणजे २०११ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते, हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करताना २०११ मध्ये जनगणनेच्यावेळी संबंधित व्यक्ती दिलेल्या पत्त्यावर राहात होती किंवा कसे, संबंधित इमारत कधी बांधण्यात आली इत्यादी बाबी लक्षात घ्याव्यात.

४.५.५ प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करून सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील सर्वसाधारण नागरिकाना प्रभागाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

४.५.६ प्रभाग रचनेमध्ये प्रभागांना अनुक्रमांक देण्यात येतात. प्रभागाचे क्षेत्र तात्काळ लक्षात यावे याकरिता प्रभागांना अनुक्रमांकासोबत प्रभागाचे नाव देता येईल किंवा कसे? हेही तपासावे. प्रभागांना नाव देणे हे बंधनकारक नाही. तथापि, जिल्हाधिकारी प्रभागांना नाव देण्याबाबत निर्णय घेऊ शकतात. प्रभागांना नाव द्यावयाचे झाल्यास ते अशाप्रकारे देण्यात यावे, जेणेकरुन सदर प्रभाग कोणत्या क्षेत्रातील आहे हे तात्काळ लक्षात येईल. उदा.

त्या प्रभागातील प्रसिध्द असलेले महत्वाचे ठिकाण अथवा त्या प्रभागातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले एखादे नगर अथवा वस्ती, इ.

## ४.६ प्रभागाची लोकसंख्या आणि मर्यादेचे पालन:

प्रभाग रचना करताना प्रभागातील सरासरी लोकसंख्या, जागांचे गुणोत्तर आणि १० टक्के कमाल/ किमान मर्यादेचे पालन करावे. अपवादात्मक परिस्थितीत भौगोलिक परिस्थितीमुळे अगर प्रगणक गट न फोडल्यामुळे प्रभागाची लोकसंख्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी अगर जास्त होत असेल, तर त्यास आयोगाची मान्यता असणे आवश्यक आहे.

## ४.७ गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे:

४.७.१ नगरपरिषदेच्या प्रभाग रचनेची मांडणी गुगल अर्थच्या नकाशावर खालीलप्रमाणे करणे अनिवार्य आहे:-

(i) गुगल अर्थचा नकाशा, या नकाशावर प्रगणक गटांच्या सीमा हिरव्या रंगाने दर्शवाव्यात. प्रगणक गटांचे क्रमांक व त्या प्रगणक गटांची लोकसंख्या दर्शवावी. प्रत्येक प्रगणक गटाच्या बहुभूजास त्या प्रगणक गटाचा क्रमांक, एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या लेजेंडमध्ये भरावी.

(ii) जनगणना प्रभागांच्या सीमा, निळया रंगाने दर्शवाव्यात.

(iii) नकाशावर शहरातील महत्वाची ठिकाणे, रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे दर्शवावे.

(iv) नवीन निवडणूक प्रभागांच्या हद्दी लाल रंगाने दर्शविण्यात याव्यात.

(v) नकाशांचा आकार, नकाशावर दर्शविलेले प्रगणक गटांचे क्रमांक, लोकसंख्या, इत्यादी तपशील वाचता येईल या प्रमाणात असावा. नकाशे सुलभपणे हाताळता यावेत याकरिता आवश्यक असल्यास दोन किंवा तीन भागात नकाशे तयार करावेत.

(vi) प्रत्येक प्रभागाचा स्वतंत्र नकाशा तयार करावा, त्याच्या हद्दी स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात. त्या हद्दींवर असणारे रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे नकाशावर नमूद करावेत.

(vii) प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणनेकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आलेली आहे, याचीही खात्री करावी.

४.७.२ आयोगाचे निकष, अधिनियमातील व नियमातील तरतुदी, मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने दिलेले निदेश विचारात घेऊन प्रारुप प्रभाग रचना तयार करावी.

४.७.३ मागील अनेक निवडणुकांमध्ये आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून अनेकदा चुका होतात. राजकीय दबावाला बळी पडून अयोग्य प्रकारे प्रभाग रचना केली जाते. अशामुळे अलिकडच्या काळात अनेक रिट याचिका मा. उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. काही याचिकांमध्ये अशा चुकीच्या प्रभाग रचनेबाबत आदेश दिलेले आहेत. यामुळे तयार केलेला प्रभाग रचनेचा आराखडा कसा तयार करण्यात आला? का तयार करण्यात आला? नियम व निकषांचे पालन झाले आहे का? इत्यादी बाबी आयोगाकडून तपासण्यात येतील. अशा तपासणीत आढळून आलेल्या मुद्दयांवर स्पष्टीकरण करणे व योग्य बदल करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीची असेल.

४.७.४ वरील परिच्छेदानुसार कार्यवाही करून कच्चा आराखडा जतन करण्यात येईल व आरक्षण सोडतीच्या दिनांकापर्यंत त्याची गोपनीयता राखण्यात येईल. समितीव्यतिरिक्त इतर कोणालाही आराखड्याची माहिती दिली जाणार नाही.

४.७.५ अशा तयार केलेल्या नकाशाची केएमएल (KML) / केएमझेड (KMZ) फाईल तयार करावी. संपूर्ण हद्दीची तसेच प्रभागनिहाय इमेज फाईल देखील तयार करावी. गुगल अर्थच्या नकाशावर प्रभाग रचना मांडणी करण्याची कार्यपध्दती **परिशिष्ट ७** मध्ये देण्यात आली आहे. या कार्यपध्दतीचा अवलंब करून केएमएल (kml) / केएमझेड (kmz) फाईल तयार करावी.

४.७.६ प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणनेकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आली आहे, याची खात्री करावी.

**४.८ त्यानंतर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव मुख्याधिकारी यांनी पुढीलप्रमाणे तयार करावा.**

i. परिशिष्ट १ - सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना.
ii. परिशिष्ट २ - हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत.
iii. परिशिष्ट ३ - प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र.
iv. परिशिष्ट ४ - प्रगणक गटनिहाय माहिती.
v. परिशिष्ट ५- अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम.
vi. परिशिष्ट ६- अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम.
vii. परिशिष्ट ७ - प्रारूप प्रभाग रचना तपासणी झाल्यावर द्यावयाचे प्रमाणपत्र.
viii. परिशिष्ट ८- सोडत व प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दी-जाहीर सूचनेचा नमुना.
ix. परिशिष्ट ९ - आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.
x. परिशिष्ट १० - सोडतीच्या इतिवृत्ताचा नमुना.
xi. परिशिष्ट ११- सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील.
xii. परिशिष्ट १२- आरक्षित प्रभागांमधील तपशील.
xiii. परिशिष्ट १३- हरकती व सूचनांचा नमुना.
xiv. परिशिष्ट १४- हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीचा नमुना.

५ **आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ पहिली निवडणूक-** दि.१५ डिसेंबर २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ च्या, नियम क्र. ८ मधील तरतुदीनुसार आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सदर निवडणूक ही पहिली निवडणूक असल्याची तरतूद करण्यात आली आहे.

**६ अनुसूचित जातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे:**

अनुसूचित जातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ च्या, नियम क्र. ३ मधील तरतुदीनुसार करावयाचे आहे. याकरिता प्रभागातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी **परिशिष्ट-५** नुसार करण्यात येईल. त्यानंतर सदर नियमातील तरतुदीनुसार उतरत्या क्रमाने प्रत्येक प्रभागात अनुसूचित जातीची एक जागा वाटप करण्यात येईल.

**७ अनुसूचित जमाती करिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे.**

अनुसूचित जमातीच्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ च्या, नियम क्र. ४ मधील तरतुदीनुसार करावयाचे आहे. याकरिता प्रभागातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी **परिशिष्ट-६** नुसार करण्यात येईल. त्यानंतर सदर नियमातील तरतुदीनुसार उतरत्या क्रमाने प्रत्येक प्रभागात अनुसूचित जमातीची एक जागा वाटप करण्यात येईल.

८ **एकाच प्रभागात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जागा येत असल्यास :-** शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ च्या, नियम क्र. ५ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवावयाच्या परिषद सदस्यांच्या जागा नेमून देतेवेळी अनुसूचित जातींच्या जागा आणि अनुसूचित जमातींच्या जागा लोकसंख्येच्या टक्केवारीच्या

आधारे जर एकाच प्रभागामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन्हींसाठी जागा आरक्षित होत असतील तर, त्या प्रभागातील जागा ही या दोन प्रवर्गापैकी ज्या प्रवर्गाच्या लोकसंख्येची टक्केवारी अधिक असेल, अशा प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात येईल.

जर एखादा प्रभाग अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता उतरत्या क्रमाने आरक्षित होत असेल आणि अनुसूचित जाती व अनूसुचित जमाती दोघांचीही त्या प्रभागातील टक्केवारी समान असेल तर तो प्रभाग अनुसूचित जमातीकरीता आरक्षित होईल, कारण अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही विशिष्ट क्षेत्रामध्येच समाविष्ट असते.

९ **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय होत असल्यास** - जर नगरपरिषदेमध्ये अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीकरिता एकच पद देय होत असल्यास, प्रथम निवडणुकीत ते त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होईल किंवा कसे हे सोडतीने निश्चित करण्यात येईल. जर मागील निवडणुकीत तसेच या निवडणुकीत एकच पद देय होत असेल तर जर ते पद मागील निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असल्यास या निवडणुकीत ते पद त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित राहणार नाही. याचप्रमाणे जर मागील निवडणुकीत त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित नसेल तर या निवडणुकीत ते पद त्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होईल.

**१० नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे :-**

वर उल्लेख केल्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १५/१२/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये सद्यस्थितीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता कोणत्याही जागा देय होणार नाहीत.

**११ महिलांचे (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसह) आरक्षित प्रभाग निश्चित करणे** :

शासनाने दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषदा (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२१ च्या, नियम क्र. ७

मध्ये अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला यांचे वाटप करण्याची पध्दत विहित केलेली आहे. मात्र वर उल्लेख केल्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १५/१२/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये सद्यस्थितीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता कोणत्याही जागा देय होणार नाहीत.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या महिलांचे वाटप उपरोक्त नियमातील नियम क्र. ७ (२) नुसार करण्यात यावे. तसेच उर्वरित महिलांच्या (सर्वसाधारण महिला) जागांचे वाटप नियम क्र.७ (४) मधील तरतुदींनुसार करण्यात यावे.

### ११.१ प्रभाग रचनेची प्राथमिक तपासणी :

सार्वत्रिक निवडणुकीसाठी कच्ची प्रारुप प्रभाग रचना तयार करण्याकरिता मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील अधिकाऱ्यांची समिती तयार करण्यात यावी.

i. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राची संपूर्ण माहिती असलेला अधिकारी.
ii. प्रभाग रचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी.
iii. नगर रचनाकार.
iv. संगणक तज्ञ.
v. आवश्यकतेनुसार इतर अधिकारी.

प्रारुप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार व योग्य ती दक्षता घेऊन तयार करण्याची जबाबदारी या समितीची असेल.

### ११.२ प्रारूप तयार करणे:

प्रभाग रचनेशी संबंधित अधिकाऱ्यांनी तयार केलेला कच्चा आराखडा प्रभाग रचना समितीसमोर ठेवण्यात येईल. सदर समिती हा आराखडा अधिनियमातील तरतूदी, नियमातील तरतूदी व या आदेशातील तरतूदींचे पालन करून तयार केला आहे हे तपासेल.

त्याचप्रमाणे प्रभाग रचना, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व महिलांचे आरक्षण हे नियमानुसार तयार झाले आहे हे देखील तपासेल. सदर समिती प्रारूप प्रभाग रचनेचे गुगल अर्थ नकाशे परिच्छेद ४.७ नुसार योग्य रितीने तयार केले आहेत किंवा कसे हे तपासून घेईल, अन्यथा योग्य नकाशे तयार करून घेण्याची कार्यवाही करेल. प्रभाग रचना पूर्वतयारीची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

**११.३ प्रभाग रचनेस मान्यता:**

प्रारूप प्रभाग रचनेची समितीने तपासणी केल्यानंतर प्रभाग रचनेच्या योग्यतेबाबत समितीचे समाधान झाल्यानंतर सदर समिती त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या **परिशिष्ट- ७** मधील नमुन्यात प्रमाणपत्र देईल. या प्रमाणपत्रासह प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का-६, दि.०६/०२/२०२० नुसार संबंधितांकडे मान्यतेकरिता पाठविण्यात यावा.

**११.४** समितीने सादर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेची आवश्यक ती तपासणी करून ती तरतुदीनुसार करण्यात आली आहे याची खात्री झाल्यास, संबंधितांकडून त्यास मान्यता देण्यात येईल. तसेच त्यासोबत सोडत व प्रभाग रचनेच्या पुढील टप्प्यांचा कार्यक्रम देण्यात येईल.

## १२ महिला (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसह ) आरक्षणाची सोडत काढणे:

१२.१ आयोगाच्या दि.०६/०२/२०२० च्या आदेशानुसार संबंधितांनी प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास नगरपरिषद क्षेत्रामध्ये सभा आयोजित करून नागरिकांच्या समोर सोडत पध्दतीने महिला (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसह) राखीव जागांचे आरक्षण निश्चित करावे.

१२.२ जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नाही, अशा अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली सोडत काढावी.

१२.३ सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक यांना मोठ्याप्रमाणावर प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, नगरपरिषद मुख्यालय व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेब साईट, इत्यादी) आरक्षणाची सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी याकरिता वर्तमानपत्रात द्यावयाच्या सूचनेचा नमुना **परिशिष्ट- ८** मध्ये देण्यात आला आहे.

१२.४ नगरपरिषद निवडणुकांकरिता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्वे सोबतच्या परिशिष्ट-९ मध्ये नमूद करण्यात आलेली आहेत.

१२.५ सोडतीचे योग्यप्रकारे इतिवृत्त लिहिण्यात यावे. इतिवृत्ताचा नमुना **परिशिष्ट १०** मध्ये देण्यात आलेला आहे.

## १३ प्रारूप प्रभाग रचनेची व आरक्षणांची व्यापक प्रसिद्धी:

१३.१.१ प्रत्येक प्रवर्गातील महिलांच्या जागांची सोडत काढल्यानंतर निश्चित करण्यात आलेल्या जागांचे आरक्षण नमूद करुन प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

१३.१.२ प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रभाग रचनेच्या नकाशांवर व विहित नमुन्यांवर संबंधीत जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी व नगररचनाकार यांच्या स्वाक्षऱ्या असणे अनिवार्य आहे.

१३.१.३ सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील परिशिष्ट-११ व १२ मध्ये नमूद करावा.

१३.१.४ सोडतीचा निकाल वेबसाईटवर टाकण्यात यावा.

१३.१.५ महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार सर्व आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. त्याच धर्तीवर नगरपरिषदांच्या निवडणुकांकरितासुध्दा सोडतीमध्ये आलेले आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली ही कार्यपध्दती योग्य असल्याचे मुंबई उच्च

न्यायालयाने अहमदनगर महानगरपालिकेशी संबंधित रिट पिटीशन क्रमांक-३६४८/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयात नमूद केले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समान पध्दतीचा अवलंब करणे योग्य असल्याने, नागरिकांचा मागासवर्ग व महिला (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसह) यांच्याकरिता कोणते प्रभाग आरक्षित होतील, हे निश्चित करण्यात येईल व त्यानंतर सदर आरक्षण नमूद करूनच प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी.

## १४ हरकती व सूचना:

**१४.१** आरक्षण सोडतीअंती नागरिकांना प्रभाग रचना व आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीची माहिती देण्यात येईल.

**१४.२** हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना स्विकारण्याची व्यवस्था नगरपरिषद कार्यालयात करण्यात येईल.

**१४.३** हरकत किंवा सूचना दाखल केल्याची संबंधीतांना पोचपावती देण्यात यावी, ज्यामध्ये त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद केला जाईल.

**१४.४** आलेल्या हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

**१४.५** प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांचा गोषवारा तयार करण्यात येईल आणि सदर गोषवारा नेमून दिलेल्या दिनांकास जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येईल.

**१४.६** प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व त्या कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, नगरपरिषदा प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड, वेबसाईट, इत्यादी)

**१४.७** प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल, याची उपाययोजना जिल्हाधिकारी यांनी करावी. (उदा. प्राप्त होणाऱ्या हरकती व

सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी)

**१५ प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे-**

**१५.१** राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का-६, दि.०६/०२/२०२० नुसार, प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निश्चित केलेल्या स्थळी व नेमून दिलेल्या दिनांकास / कालावधीमध्ये सुनावणी देण्यात यावी.

**१५.२** या सुनावणीकरिता सर्व व्यवस्था (उदा. हरकतदारांना सुनावणीची लेखी नोटीस देणे, उपस्थितांची स्वाक्षरी घेणे, सुनावणीचे विवरणपत्र ठेवणे, सुनावणीच्या ठिकाणी व्हिडिओ चित्रीकरणाची व्यवस्था करणे, इत्यादी) जिल्हाधिकारी यांनी करावी.

**१५.३** सुनावणीच्यावेळी केलेली प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण सर्वांना दिसेल अशाप्रकारे मोठ्या स्क्रीनवर दर्शविण्यात यावी. प्रभागांच्या हद्दीबाबत असलेल्या हरकतींसंदर्भात गुगल अर्थच्या नकाशावर सध्याचे प्रारुप प्रभाग व हरकतदाराने प्रभागांच्या हद्दीमध्ये मागणी केलेले बदल स्क्रीनवर दाखविण्यात यावेत.

**१५.४** हरकती व सूचनांना सुनावणी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रत्येक तक्रार व सूचनांची दखल घेऊन नियमाप्रमाणे योग्य ते अभिप्राय देणे आवश्यक आहे. अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्याची आवश्यकता नाही.

**१६ अंतिम प्रभाग रचना:**

**१६.१** सुनावणीनंतर तयार केलेला प्रस्ताव, हरकती व सूचना दिलेल्या सुनावणीच्या गोषवाऱ्यासह संबंधितांकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करावा.

**१६.२** संबंधितांनी प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर त्यानुसार प्रभाग रचनेच्या प्रस्तावात (सर्व विवरणपत्रे, नकाशे व अधिसूचना) योग्य ते बदल जिल्हाधिकारी यांनी करावेत. त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना जिल्हाधिकारी यांचेकडून शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

**१६.३** या अंतिम अधिसूचनेला व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, नगरपरिषद व प्रभाग कार्यालयांचे नोटीस बोर्ड / वेब साईट, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईट, इत्यादी) अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेची **एक प्रत** राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात यावी.

**१६.४** प्रभाग रचनेच्या (दोन्ही प्रारुप व अंतिम) प्रसिध्द करण्यात येणाऱ्या नकाशांवर जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तसेच संबंधित नगर रचनाकार (यथास्थिती सहायक संचालक, नगर रचनाकार) यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे. तसेच सर्व परिशिष्टांवर जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक राहील.

**१६.५** यानंतर अंतिम प्रभाग रचनेवर कोणतीही हरकत अगर सुनावणी नियमानुसार अभिप्रेत नाही.

## १७ गोपनीयता:

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभाग रचनेचे कामकाज गोपनीयरित्या हाताळण्यात यावे. प्रभाग रचनेची माहिती ही सर्वसामान्य नागरिकांना सोडतीच्यावेळी पहिल्यांदा समजते. तत्पूर्वी राजकीय व्यक्ती, प्रसिध्दी माध्यमे अथवा अन्य व्यक्तींना याबाबतची माहिती देता येणार नाही तसेच प्रभाग रचनेच्या कामाशी संबंधित अधिकारी अगर कर्मचारी यांच्यावर त्यासाठी कोणालाही दबाव टाकता येणार नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने / कर्मचाऱ्याने प्रभाग रचनेची गोपनियता भंग केल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

## १८ सर्वसाधारण

१८.१ भारताच्या संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाचे पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित केले आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा मुख्याधिकारी यांना स्वतःहून निवडणूक कार्यक्रमात कोणताही बदल अगर स्थगिती देता येत नाही.

१८.२ राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग रचना व आरक्षण या विषयावर यापूर्वी काढलेले आदेशात काहीही म्हटले असले तरी, यापुढे होणाऱ्या सर्व निवडणूकांमध्ये केवळ **नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक बहुसदस्यीय प्रभाग रचना (सदस्य संख्या, प्रभाग रचना करणे व आरक्षण) आदेश,** २०२१ या आदेशामध्ये केलेल्या तरतुदी लागू राहतील.

( यु. पी. एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र

<u>सहपत्र</u> :-

सोबतच्या अनुक्रमणिकेत दर्शविल्यानुसार परिशिष्ट १ ते १४

प्रति,

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व संबंधित नगरपरिषदांचे मुख्याधिकारी/ प्रशासक
६. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
७. आयोगातील सर्व कार्यासने
८. निवड नस्ती.

# परिशिष्टांची अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | परिशिष्ट क्रमांक |
|---|---|---|
| १ | सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना. | परिशिष्ट - १ |
| २ | हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत. | परिशिष्ट - २ |
| ३ | प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र | परिशिष्ट - ३ |
| ४ | प्रगणक गटनिहाय माहिती. | परिशिष्ट - ४ |
| ५ | अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम. | परिशिष्ट - ५ |
| ६ | अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम. | परिशिष्ट - ६ |
| ७ | प्रारूप प्रभाग रचना तपासणी झाल्यावर द्यावयाचे प्रमाणपत्र | परिशिष्ट - ७ |
| ८ | सोडत व प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्द- जाहीर सूचनेचा नमुना | परिशिष्ट - ८ |
| ९ | आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्वे | परिशिष्ट - ९ |
| १० | सोडतीच्या इतिवृत्ताचा नमुना | परिशिष्ट - १० |
| ११ | सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील | परिशिष्ट - ११ |
| १२ | आरक्षित प्रभांगामधील तपशील | परिशिष्ट - १२ |
| १३ | हरकती व सूचनांचा नमुना | परिशिष्ट - १३ |
| १४ | हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीचा नमुना | परिशिष्ट - १४ |

## परिशिष्ट – १ (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना)

## -------------- नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक ---------(सन)

१. नगरपरिषद क्षेत्राची एकूण लोकसंख्या
(लगतच्या जनगणनेनुसार) –

२. अनुसूचित जातीची लोकसंख्या –
(लगतच्या जनगणनेनुसार)

३. अनुसूचित जमातीची लोकसंख्या –
(लगतच्या जनगणनेनुसार)

४. निवडून द्यावयाच्या नगरपरिषद
सदस्यांची संख्या –

५. प्रभागांची एकूण संख्या –

| दोन सदस्यीय प्रभाग | तीन सदस्यीय प्रभाग |
|---|---|
| | |

६. प्रभागाची सरासरी लोकसंख्या

$$= \frac{\text{नगरपरिषदेची एकूण लोकसंख्या (अनु.क्र.१)}}{\text{नगरपरिषदेची एकूण सदस्य संख्या (अनु.क्र.४)}} \times \text{प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या}$$

| प्रभागातील सदस्यांची संख्या | सरासरी लोकसंख्या | कमाल (+) १०% | किमान (–) १०% |
|---|---|---|---|
| दोन सदस्यीय प्रभाग | | | |
| तीन सदस्यीय प्रभाग | | | |

७. अनुसूचित जातीकरीता राखून ठेवावयाच्या एकूण जागा –
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातीची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{ एकूण सदस्य संख्या} )$$

८. अनुसूचित जमातीकरीता राखून ठेवावयाच्या एकूण जागा –
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातीची लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times \text{ एकूण सदस्य संख्या} )$$

९. अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा –

$$( \text{सूत्र} = \frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{2} )$$

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१.अनुसूचित जातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

२. अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

३. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

( सूत्र = अ.क्र. ९ (अ) - [अ.क्र.९ (ब१) + ९ (ब२)] )

**टीप :-** स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

१०. अराखीव –
( सूत्र = अ.क्र. ४ - [ अ.क्र.७ + अ.क्र.८ + अ.क्र.९ ( ब ३ )] )

सही

मुख्याधिकारी, ............... नगरपरिषद

# परिशिष्ट २

## (हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत)

## ---------- नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक ---- (सन)

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची व्याप्ती (प्रभागातील थोडक्यात महत्त्वाची ठिकाणे/परिसर/नगरे इ. नमूद करावीत) | प्रभागाच्या सीमा | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती / अनु.जमाती व स्त्रियांसाठी (अनु.जाती / अनु. जमातीच्या स्त्रियांसाठी धरुन ) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| प्रभाग क्रमांक<br>-लोकसंख्या-<br>एकूण -<br>अ.जा. -<br>अ.ज. - | | | उत्तर -<br><br>पूर्व -<br><br>दक्षिण -<br><br>पश्चिम - | |

सही

मुख्याधिकारी, ................नगरपरिषद

**टीप - हा नमुना इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये असावा.**

## परिशिष्ट – ३

**(प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र)**

**जनगणना प्रभाग क्रमांक – – – – – – – – – – – पैकी प्रगणक गट क्रमांक – – – – – – – फोडणे आवश्यक ठरेल त्याची चौकशी करुन लोकसंख्या निश्चित केली त्याचा तपशिल**

सर्वेक्षण केल्याची तारीख :------------------

| अ.क्र. | जनगणना घर क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नाव | सन २०११ ची लोकसंख्या | अनुसूचित जाती (असल्यास लोकसंख्या) | अनुसूचित जमाती (असल्यास लोकसंख्या) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | **एकूण** | | | | |

| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|
| १. प्रगणक गटाची लोकसंख्या | | | |
| २. फोडलेल्या प्रगणक गटाचे सर्वेक्षण प्रमाणे निश्चित केलेली लोकसंख्या (वजा) | | | |
| – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – | | | |
| ३. लगतच्या निवडणूक प्रभागांसाठी विचारात घ्यावयाची उर्वरित लोकसंख्या (वरील १ – २ ) | – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – | | |

मुख्याधिकारी, -------------नगरपरिषद

| परिशिष्ट – ४ (प्रगणक गटनिहाय माहिती) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **ENUMARATION BLOCKWISE INFORMATION** | | | | | | |
| **………………... MUNICIPAL COUNCIL** | | | | | | |
| **SR. No.** | **EnumarationWard No.** | **Enumaration Block No.** | **Total Population** | **SC** | **ST** | **WARD NO. IN Which the EB is included** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही
मुख्याधिकारी, ………नगरपरिषद

| नमुना विवरणपत्र | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **………..MUNICIPAL COUNCIL** | | | | | | |
| **SR. No.** | **EnumarationWard No.** | **Enumaration Block No.** | **Total Population** | **SC** | **ST** | **WARD NO. IN Which the EB is included** |
| १ | १ | १ | .. | … | … | १ |
| २ | १ | ३ | .. | … | … | ५ |
| ३ | १ | ४ | .. | … | … | १ |
| ४ | २ | १ | .. | … | … | ६ |
| ५ | २ | २ | .. | … | … | ६ |
| ६ | २ | ३ | .. | … | … | २ |
| ७ | २ | ४ | .. | … | … | २ |
| . | . | | | | | |
| . | . | | | | | |
| | याप्रमाणे | याप्रमाणे | | | | |

## परिशिष्ट – ५ (अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम)

## ……………….. MUNICIPAL COUNCIL

## STATEMENT SHOWING SHEDULE CASTE DESCEDING ORDER

| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | SC% | RESVN |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही
मुख्याधिकारी, ……नगरपरिषद

| परिशिष्ट – ६ (अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ……………….. MUNICIPAL COUNCILS | | | | | | |
| STATEMENT SHOWING SHEDULE TRIBE DESCEDING ORDER | | | | | | |
| SR. No. | Ward No. | Total | SC | ST | ST% | RESVN |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही
मुख्याधिकारी, ………नगरपरिषद

# परिशिष्ट- ७

## (प्रारुप प्रभाग रचना प्रस्ताव तपासणी झाल्यावर द्यावयाचे)

## प्रमाणपत्र – प्रारुप प्रभाग रचना

नगरपरिषदेचे नाव - ............................................

प्रमाणित करण्यात येते की, -------------------नगरपरिषदेच्या सन -------- मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना खालील दक्षता घेऊन करण्यात आलेली आहे.

१) जनगणना कार्यालयाकडून प्राप्त सन २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटांचे नकाशे वापरण्यात आलेले आहेत.

२) ज्या ठिकाणी जनगणना कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही (त्या आशयाचे संचालक, जनगणना कार्यालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) तेथे २०११ ची लोकसंख्या सर्वेक्षण करुन निश्चित करण्यात आलेली आहे.

३) प्रत्येक प्रभागामध्ये येणारे प्रगणक गट, नकाशानुसार त्याच प्रभागामध्ये समाविष्ट आहेत.

४) गुगल अर्थ किंवा तत्सम संगणकीकृत नकाशांच्या आधारे प्रभाग रचना करण्यात आली आहे.

५) महाराष्ट्र नगरपरिषदा/नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ तसेच त्याअंतर्गत नियम व राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निर्देश व सूचना यांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

६) प्रभागांच्या हद्दींचे वर्णन, व्याप्ती, लोकसंख्या व आरक्षण योग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे.

७) प्रारुप प्रभाग रचना उपलब्ध माहितीच्या आधारावर नि:पक्षपातीपणे तयार करण्यात आली आहे.

ठिकाण ---------

दिनांक---------

स्वाक्षरी

मुख्याधिकारी,

------------नगरपरिषद

# परिशिष्ट-८

## (सोडत व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी - जाहीर सूचनेचा नमुना)

### नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूक -------

जाहीर सूचना

---------- नगरपरिषदेच्या सन ---- मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच प्रभाग रचनेचे प्रारुप प्रसिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार ---------<br>दिनांक ---------<br>सकाळी ------- वा.<br>स्थळ - ----------<br>------------ |
| २ | प्रभाग रचनेचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | -----वार, दिनांक ------ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात) | -----वार, दिनांक --------- ते<br>-----वार, दिनांक ---------<br>(दुपारी ३.०० वा.पर्यंत) |
| **टीप** : हरकती व सूचना दाखल करणा-या नागरीकांना सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. | | |

ठिकाण :------------- मुख्याधिकारी,

दिनांक :------------- --------नगरपरिषद

# परिशिष्ट-९

## (नगरपरिषदेच्या निवडणूकांकरीता आरक्षणाची सोडत काढण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे)

१. नगरपरिषदेच्या आरक्षणाची सोडत राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिवशी काढण्यात यावी.
२. सोडतीच्या तीन ते चार दिवस अगोदर सोडतीची रंगीत तालीम निश्चितपणे करण्यात यावी.
३. सोडतीचे इतिवृत्त लिहिण्यात यावे.
४. सोडत जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीत पार पाडण्यात यावी.
५. सोडतीसाठी व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीसाठी करावयाच्या जाहिर सूचनेचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने परिशिष्टांमध्ये विहित केल्यानुसार राहील. ही सूचना सोडतीच्या दोन/तीन दिवस आधी किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.
६. सोडतीसाठी पारदर्शक ड्रम वापरण्यात यावा.
७. ड्रममध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A4 या आकाराचा असावा.
८. चिठ्ठी रोल करुन त्यावर लावण्यात येणारे रबर बॅण्ड एकाच रंगाचे असावे व ते चिठ्ठीच्या मध्यभागी लावावेत.
९. सोडतीच्यावेळी सर्व प्रभाग दर्शविणारा एकत्रित नकाशा तसेच प्रत्येक प्रभागाचा हद्दी दर्शविणारा स्वतंत्र नकाशा ठळकपणे दिसेल अशारितीने लावून ठेवावा. प्रत्येक प्रभागाच्या सीमा सोडतीच्या वेळी स्पष्ट करण्यात याव्यात.
१०. सोडत शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात यावी.
११. कोणत्या पदांच्या आरक्षणाची सोडत कोणत्या प्रभागातून कशाप्रकारे काढण्यात येणार आहे याची सविस्तर माहिती दर्शविणारे पत्रक तयार करून सर्व उपस्थितांना सोडतीपूर्वी वाटण्यात यावे तसेच त्याला पुरेशी प्रसिद्धी देण्यात यावी.
१२. सोडतीमध्ये आलेला जागा क्रमांक प्रोजेक्टरद्वारे मोठया पडद्यावर दर्शविण्यात यावा.
१३. संपूर्ण सोडत प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात यावे.
१४. सोडतीचे प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.
१५. नागरिकांना सविस्तर माहिती देण्यासाठी एक प्रसिद्धीपत्रक तयार करुन त्यास पुरेशा आधी खाली नमूद केल्याप्रमाणे व्यापक प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात यावी.
    i) नगरपरिषदेच्या सूचना फलकावर
    ii) नगरपरिषदेच्या प्रभाग समितीच्या सूचना फलकावर
    iii) नगरपरिषदेच्या इतर कार्यालयांमध्ये सूचना फलकावर
    iv) स्थानिक केबल टिव्हीवर
    v) फ्लेक्स बोर्ड तयार करून शहरात मुख्य ठिकाणी लावण्यात यावेत.

.................

## परिशिष्ट- १०
## इतिवृत्ताचा नमुना

आज दि. -------- रोजी सकाळी / दुपारी ----------- वाजता ------------ नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी यथास्थिती प्राधान्यक्रमाने अथवा चिठ्ठ्या टाकून जागांचे आरक्षण निश्चित करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात आली :-

१. प्रथम उपस्थित सर्व प्रतिनिधी / नागरिक यांना नगरपरिषदेच्या निवडणुकीसंबंधी खाली नमूद केल्याप्रमाणे सविस्तर माहिती देण्यात आली :-

१) प्रभागांची संख्या

२) सदस्य संख्या

३) आरक्षण

४) प्रभागांची व्याप्ती इ.

२. सोडतीकरिता --------------- शाळेतील खालील लहान मुले / मुली उपस्थित होते :-

१) ------------------------------------

२) ------------------------------------

३) ----------------------------- याप्रमाणे

सदर मुलांच्या हस्ते पुढील सोडती काढण्यात आल्या.

३. **अनुसूचित जाती महिलांची सोडत :-** अनुसूचित जातीकरिता ------- जागा आरक्षित असून लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने आरक्षित असलेल्या प्रभागांमधून अनुसूचित जातीच्या महिलांकरिता --------- प्रभाग सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले :-

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे अनुसूचित जातीच्या प्रभागांचे क्रमांक | सोडतीमध्ये अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|
| | |

४. **अनुसूचित जमाती महिलांची सोडत :-** अनुसूचित जमातीकरिता ------- जागा आरक्षित असून लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने आरक्षित असलेल्या प्रभागांमधून अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता --------- प्रभाग सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले :-

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे अनुसूचित जमातीच्या प्रभागांचे क्रमांक | सोडतीमध्ये अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|
| | |

५ **<u>सर्वसाधारण महिलांची सोडत</u> :-** सर्वसाधारण असलेल्या ------ प्रभागांपैकी -------इतके प्रभाग सर्वसाधारण महिलांसाठी थेट अथवा सोडतीने खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले.

| सोडतीकरिता उपलब्ध असणारे सर्वसाधारण प्रभागांचे क्रमांक | सोडतीमध्ये सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|
| | |

वरीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरुन उपस्थित मुलाच्या हाताने उपस्थित सर्व नागरिक / प्रतिनिधी यांचे समक्ष चिठ्ठ्या काढण्यात आल्या, अथवा यथास्थिती प्राधान्यक्रम विचारात घेऊन आरक्षित प्रभाग निश्चित करण्यात आले. त्यानुसार सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जागा निश्चित करण्यात आल्या.

वरीलप्रमाणे चिठ्ठ्या टाकण्याची कार्यपध्दती सर्व उपस्थित नागरिक / प्रतिनिधी यांचे समक्ष पूर्ण करण्यात आली. त्यानंतर प्रभागनिहाय बिनराखीव जागांचा तपशिल देण्यात आला. प्रभागांच्या हद्दींबाबत, आरक्षणाबाबत, सोडत पध्दतीनुसार निश्चित केलेल्या प्रभागनिहाय जागेबाबत तसेच प्रभाग रचनेबाबत अन्य कोणतीही काहीही तक्रार असल्यास प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द झाल्यानंतर विहित कालावधीत हरकती व सूचना दाखल करण्याची माहिती देण्यात आली. वरीलप्रमाणे कामकाज पूर्ण करण्यात येऊन उपस्थित सदस्य / नागरिकांचे / प्रतिनिधींचे आभार मानून विषयांकीत सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**मुख्याधिकारी ----------- नगरपरिषद.**

**दिनांक:**

<u>टीप:</u>

(१) सभेत द्यायच्या माहितीमध्ये प्रथम कोणत्या सालाची जनगणना विचारात घेतली ते वर्ष, जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या, अ.जा. व अ.ज. ची लोकसंख्या, देय सदस्य संख्या, देय प्रभाग, देय प्रभागनिहाय सदस्य संख्या, देय आरक्षित जागांची संख्या देण्यात यावी.

(२) यानंतर उतरत्या क्रमाने आरक्षित झालेल्या अ.ज. व अ.जा. जागांची माहिती द्यावी.

(३) यानंतर प्रभागनिहाय राहिलेल्या जागांमधून कोणत्या प्रवर्गाचे सोडतीने किती चिठठया काढावयाच्या आहेत याबाबत माहिती देवून सोडतीची तयारी करावी.

# परिशिष्ट–११

**नगरपरिषदेचे नाव:** **सोडतीचा दिनांक:**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ... | | | |
| याप्रमाणे | | | |

सही/-

नगरपरिषद मुख्याधिकारी

---------- नगरपरिषद

# परिशिष्ट–१२

**नगरपरिषदेचे नाव:** **सोडतीचा दिनांक:**

| अ.क्र. | तपशिल | आरक्षित प्रभाग क्रमांक | पैकी महिलांकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांचे क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | सर्वसाधारण | | |
| | **एकूण** | | |

सही/-

मुख्याधिकारी

---------- नगरपरिषद

परिशिष्ट-१३

## हरकती व सूचनांचा गोषवारा

----------- नगरपरिषद

हरकतींचा कालावधी दि. ----------- ते ------------ पर्यंत

| अ. क्र. | हरकतदाराचे नाव | हरकतीचे स्वरुप | संबंधित प्रभाग क्रमांक | जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

उपजिल्हाधिकारी

मुख्याधिकारी
------- नगरपरिषद

# परिशिष्ट-१४

## हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीचा गोषवारा

हरकती व सूचनांवर सुनावणी दिल्यानंतर प्राधिकृत अधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावयाचे विवरणपत्र

----------- नगरपरिषद सुनावणीचा दिनांक ----------

| अ. क्र. | आक्षेप क्रमांक | हरकतदाराचे नाव | हरकतीचे स्वरुप | संबंधित प्रभाग क्रमांक | मुख्याधिकारी यांचे अभिप्राय | प्राधिकृत अधिकारी यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

मुख्याधिकारी
------- नगरपरिषद

प्राधिकृत अधिकारी
----------------